प्रेस नोट

जा.क्र. ३६९ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– २१/०७/२०१८

## " अल्पवयीन मुलीचे विनयभंग करणाऱ्या आरोपीस तिन वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे साकोली अंतर्गत गोंडउमरी येथिल तक्रारदार अल्पवयीन पिडित मुलगी वय १७ वर्ष हिचे ईसम नामे सचिन पुंडलीक चांदेवार, वय २१ वर्ष, रा. गोंडउमरी ता. साकोली, जिल्हा भंडारा याने शारीरीक लगट करून विनयभंग केल्याचे आरोप सिध्द झाल्याने दिनांक २०.०७.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त प्रथम सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपीस तिन वर्ष सश्रम कारावास व २०००/– रूपये द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, अल्पवयीन पिडीत मुलीचे आई वडीले घटणेच्या एक महिण्यापासनु बाहेर गावी मजुरी कामाने गेले असल्याने पिडित व दोन बहिन भाउ काका कडे राहत होते. दिनांक १६.०१२.२०१४ रोजी रात्रीचे जेवन करून घरी हजर असता रात्री १०.०० वा. सुमारास घरासमोरील अंगणात लघशंकेस करण्यास आली असता गावातीलच मोहल्यात राहणारा सचिन पुंडलीक चांदेवार हा अचानक पिडितेचे मागेहुन येवुन पिडित मुलीशी बळजबरीने शारीरीक लगट करून विनयभंग केला त्यास प्रतीकार करून आरडा ओरडा केला असता आरोपी हा त्याठिकाणा वरून पळुन गेला. पिडित मुलगी आपले काका व काकु सोबत पोलीस स्टेशन साकोली येथे येवुन पिडितेने सचिन पुंडलीक चांदेवार याचे विरूध्द तोंडी तक्रार दिलेवरून, अप.क्र. १२३/१४ कलम ३५४(अ) भा.द.वि. सह कलम ८,१२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक गणेश खंडाते यांनी सुरू करून गुन्हयातील आरोपी सचिन पुंडलीक चांदेवार, वय २१ वर्ष यास तात्काळ अटक केले व साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने दोषारोप पत्र जिल्हा व सत्र

न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ७/१५ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी अतिरीक्त **सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. दिनांक २०.०७.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **सचिन पुंडलीक चांदेवार, वय २१ वर्ष** याचे विरूध्द **कलम ८ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक अधिनीयम २०१२** अन्वये दोषसिध्द झाल्याने **तिन वर्ष सश्रम कारावास व २०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास २ महिणे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, रामेश्वर पिपरेवार, ठाणेदार पोलीस ठाणे साकोली यांचे मार्गदर्शनात पोलीस नाईक, विनोद बघेल/२७ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र.९४०३१०९७२०

प्रति,

**-जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रतः** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.